**श्री. किशोर बी. देसाई**

**अध्यक्ष**



# अमृत महोत्सवी वर्षानिमित्त...

देशाच्या स्वातंत्र्योत्तर काळात गोरगरीब जनतेची खाजगी व्यापाऱ्यांकडून होणारी पिळवणूक थांबवण्याच्या उद्देशाने ग्राहक सहकारी संस्थांचा उदय झाला. **"ना नफा ना तोटा"** या सहकाराच्या तत्वावर सहकारी ग्राहक संस्था स्थापन झाल्या. आणिबाणिच्या काळात या संस्थांवर शासनाने सार्वजनिक वितरण व्यवस्थेची जबाबदारी दिली. शासनाने ग्राहक सहकारी संस्थांना जबाबदारी देते वेळी त्यांच्याकरीता उत्तेजनार्थ विविध योजना जाहिर केल्या. यामध्ये ग्राहक संस्थांना दुकाने चालू करणेसाठी शासकीय जागा भाग भांडवलात सहभाग अनुदान तसेच शासकीय कामात अग्रक्रम देण्यांत आला त्यामुळे सहकारी ग्राहक संस्थांचे जाळे मुंबई व उर्वरित महाराष्ट्रात तयार झाले.

या पार्श्वभूमीवर सुपारीबाग मध्यवर्ती सहकारी ग्राहक संस्था मुंबई या आपल्या संस्थेची ०६ जानेवारी १९४९ रोजी स्थापना करण्यांत आली. बघता बघता संस्थेची पंचाहत्तरी आली. समाजवादी विचारसरणीच्या कार्यकर्त्यांनी सामाजिक कार्य म्हणून सुरू केलेल्या या एका रोपट्याचा मोठा वटवृक्ष झाला. श्री. दत्ता साळवी, डॉ. सिताराम साळवी, ॲड. ए. बी. विचारे, डि. जी. फाटक, वासु देसाई, डॉ. जी. जी. पारिख या समाजवादी नेत्यांनी परळ - लालबाग या गिरणी कामगार विभागात संस्थेची वाटचाल सुरू केली.

पंचाहत्तरीकडे वाटचाल करते वेळी आपल्या संस्थेने अनेक बरे वाईट प्रसंग पाहिले. अडचणीच्या काळातही कधीही न डगमगता संस्थेचे कार्यकर्ते कार्यरत राहिले. त्यामुळे अनेक संस्था बंद होत असताना आपल्या संस्थेने अंखडीतपणे वाटचाल केली, आज हाताच्या बोटावर मोजण्या इतक्या ग्राहक संस्था कार्यरत आहेत. यामध्ये आपली संस्था आहे.

पंचाहत्तर वर्ष वाटचाल करते वेळी संस्थेच्या अमृतमहोत्सवी वर्षात संस्थेची उलाढाल ५० कोटीच्या वर गेली हे सांगण्यास आम्हांला अत्यंत अभिमान वाटत आहे.

मुक्त अर्थव्यवस्थेचे वारे देशामध्ये सुरु झाले ग्राहक संस्थांना खाजगी भांडवलदारांचे आव्हान निर्माण झाले. मॉल संस्कृती आली, आणि मोठ्या भांडवलदारांच्या तुलनेत ग्राहक संस्थांच्या कामकाजावर परिणाम होवू लागला यामध्ये आपल्या संस्थेचाही समावेश आहे.

या पार्श्वभूमीवर संस्थेच्या व्यवस्थापनाने वेळीच लक्ष घालून आपल्या पारंपारिक व्यवसायामध्ये बदल केले. यादृष्टीने संस्थेच्या व्यवस्थापनाने केवळ किराणा विक्री व्यवसायावर अवलंबून न राहता इतर ग्राहक सेवा सुरु केल्या यामध्ये संस्थेने औषधी दुकाने सुरु केली. महाराष्ट्र शासनाचे पाठ्यपुस्तक वितरणाचे काम, शासनाच्या उपक्रमांना विविध वस्तूंच्या पुरवठ्याच्या सेवा सुरु केल्या त्यामुळे संस्थेच्या उत्पन्नात वाढ होत गेली. संस्थेचे कामकाज अखंडीतपणे चालू राहिले.

संस्थेने सिंधुदूर्ग जिल्ह्यात कणकवली सारख्या निम्न शहरी विभागात ३५०० चौ. फुटाचे स्वंयसेवा दालन सन २००२ साली सुरु केले. आकर्षक सजावट विविध ग्राहक योजना, सर्व वस्तू एकाच छताखाली मिळण्याची व्यवस्था, स्वच्छ व निर्भेळ वस्तु, वस्तूंवर आकर्षक सवलती इत्यादी गोष्टींमुळे कणकवली येथील व आजुबाजुच्या परिसरातील ग्राहकांना आकृष्ट करण्यांचे सिंधुदूर्ग जिल्ह्यातील एकमेव ठिकाण म्हणून प्रसिध्द झाले. या ठिकाणी शाखा सुरु करते वेळी कणकवली व आजूबाजूच्या गावातील २० स्थानिक तरुण, तरुणींना रोजगाराची संधी संस्थेने उपलब्ध केली.

पारंपारीक दुकानदारी न करता फिरता फिरता खरेदी संकल्पना स्विकारण्यांत आली. विविध ग्राहक

भेट योजना राबवितांना नाट्य व सिने सृष्टीतील नामवंत कलाकार यांना निमंत्रीत करण्यांत आले होते. यामध्ये अलका कुबल, लक्ष्मीकांत बेर्डे, दिलीप प्रभावळकर, सुधीर जोशी, विजय चव्हाण, रमेश भाटकर यांचा समावेश होता.

संस्थेने के. ई. एम. रूग्णालयामध्ये सन १९९९ या वर्षात स्वस्त दराचे औषधी दुकान सुरू केले. केवळ नाममात्र नफा घेवून हे औषधी दुकान जवळपास ५ वर्षे चालविण्यात आले. रूग्णांना मिळणारी सवलत विचारात घेता परेल येथील के. ई. एम. रूग्णालयाच्या आसपास असलेल्या औषधी दुकानांवर परिणाम होवून या व्यवसायात होणारी गरीब रूग्णांची लुट कमी होवून त्याचा परिणाम संपूर्ण औषधी मार्केटवर झाला. त्यामुळे ग्राहक संस्था कशा प्रकारे मार्केट नियंत्रित करू शकतात हे आपण दाखवून दिले.

संस्था आज चांगल्या प्रकारे नफा करीत आहे. गेली २० वर्षे संस्था सभासदांना १२ टक्के इतका लाभांश देत आहे. अमृत महोत्सवी वर्षात सभासदांना १५ टक्के इतका लाभांश देण्यांत आला.

अमृत महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने संस्थेच्या कामकारांना २० टक्के बोनस देण्यांत आला. कामगार आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी स्टेट बँक ऑफ इंडिया, जनरल इन्शुरन्स कंपनीची रू. ५.०० लाखाची ग्रुप पॉलिसी काढून त्यांना वैद्यकीय सुरक्षा देण्यांत आली आहे. संस्थेचा पाया ७५ वर्षापूर्वी समाजवादी मंडळीनी घातला व हाच वसा आजतागायत समाजवादी विचारांची मंडळी व्यवस्थापन चालवित असून पुढील १० वर्षात संस्थेला साध्य करावयाची उद्दीष्टे विचारात घेवून संस्था आपली वाटचाल करणार आहे.